ISSN: 2249-894X Impact Factor :3.8014(UIF) Volume - 6 | Issue - 1 | October - 2016

Review Of Research

# महाराष्ट्रातील निवडक मातृदैवतांची ठाणी व विशेष संदर्भ तिर्थक्षेत्र तुळजापूर

**डॉ.शिवाजीराव मा.देशमुख**
मराठी विभा ा, तुळजाभवानी महाविद्यालय, तुळजापूर.



## प्रस्तावना :

महाराष्ट्रात अनेक ठिकाणी मातृदैवतांची ठाणी आहेत. त्याचे कारण आदिदेवता ही मातृदेवता मानली जाते.धरित्री आणि स्त्री हीच निर्मितीचे स्त्रोत आहे, विश्वाची जननी आहे.म्हणुन तिला आदिमाता,आदिमाया असे संबोधन आले.निसर्गाने यांनाच सर्जनाची शक्ती दिली. याकरिता दैवतांमध्ये मातृदैवतांचे स्थान अढळ राहिले.शेवटी मानवी जीवनाचा विकास मातृरुपाने प्रकटला आसून,मातृत्व हा आदराचा आणि कुतूहलाचा भाग बनला.तिच्या जीवनात नवनिर्मितीचा सोहळा पहायला मिळतो.तिला प्रसन्न करण्यासाठीच मानवाने, तिची पूजा आरंभिलेली दिसते.या संबंधी रा.चि. ढेरे लिहीतात. देवतांच्या घडणीत त्यांच्या उदय-विकासात आणि ऱ्हासातही लोकांच्या वृत्ती-प्रवृती आशा आकांशा भाव भावना क्रिया-प्रतिक्रीया काम करीत असतात अर्थातच एखाद्या देवतेच्या घडणीचा इतिहास आणि लोकप्रियतेचे रहस्य उकलण्याचा वस्तुनिष्ठ प्रयत्न केला तर त्या अध्ययनाच्या द्वारा लोकमानसाच्या विविध आंदोलनाचा इतिहास आपल्या हाती येईल.

एका पौराणिक कथेत कथन केले जाते की,शिवाला दुःखातून मुक्त करण्यासाठी विष्णूने शिवाजवळच्या भस्म झालेल्या सतीचे, तुकडे केले आणि ते तुकडे सगळीकडे विखूरले गेले, ज्या ठिकाणी या शक्तीचा अंश पडला त्या ठिकाणी एक शक्ती पीठ तयार झाले.यातून महाराष्ट्रात साडेतीन शक्तीपीठे तयार झाली आहेत.यांत अनेक मतमतांतरे आहेत.तरी ही तुळजापूरची तुळजाभवानी, माहूरगडाची रेणुकामाता, कोल्हापूरची महालक्षी आणि वणीची सप्तसृंगीदेवी या बरोबर अंबाजोगाईची जोगेश्वरीदेवी या देवीचा उल्लेख केला जातो.

तुळजापुरची तुळजाभवानी महाराष्ट्रात सर्वत्र प्रभावशाली शक्तीदेवता म्हणजे तुळजापूरची तुळजाभवानी, धार्मिक आणि ऐतिहासिक दृष्ट्या तिची महती सर्वच काळात अग्रेसर राहिली आहे.ही शक्तीदेवता महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यात सर्वच जातीसमाजातील लोकांची ही कुलदेवता आहे.दूरवरच्या लांब ठिकाणाहून या देवतेच्या कुलाचारासाठी जरी प्रत्यक्ष येता आले नाही तरी या कुलदेवतेचे स्मरण,अर्चन आणि कुलाचार नेहमीच पाळले जातात.असे असले तरी या देवतेचे मंदिर महाराष्ट्रात अनेक ठिकाणी भक्तांनी आपल्या भक्तीसाठी उभारलेले आहेत.या स्थानिक तुळजाभवानीला तुळजापूरची आई मानून तिचे सर्व कुलाचार, नवस,सायास,सकाम आणि नैमितिक पूजा ही मंडळी करीत आली आहे.या वरुन या देवतेची महती आणि भक्ती सर्वत्र किती खोलवर रुजली आहे याची प्रचिती येते. जसे बंगालमध्ये कालीमाता,आसाममधे कामाख्या देवी,उत्तरेमध्ये वैष्णोदेवी,गुजरातमध्ये अंबाजी,राजस्थानमध्ये माताजी अशी नावे पुढे येत असली तरी महाराष्ट्रात तुळजाभवानी देवीला जी महत्ता प्राप्त झाली त्याची तूलना इतर देवीशी करता येत नाही. या देवीची पुराणात त्वरजा,तुरजा अशी नावे येतात परंतु ही नावे याच देवीची आहेत याचे संकेत मिळत नाहीत.तुळजापूरच्या जवळ असलेल्या काटी या गावी सापडलेल्या शिलालेखात या देवीच्या संदर्भात एक उल्लेख आढळतो.चौदाव्या शतकतील हा शिलालेख असावा असे अभ्यासकांचे मत

आहे.पुढे शिवकाळात या देवीचा उल्लेख छत्रपती शिवरायाच्या चरित्रात येतो.या वरुन ही देवता किती प्रसिध्द होती हे समजते.काळ्या पाषाणातील ही मूर्ती तिला वज्रलेप केलेला आहे.ती एकाच पाषाण दगडात कोरलेली आहे.ही देवी अष्टभूजा असून एका हातात.तिने राक्षसाची शेंडी धरलेली आहे. तिचा उजवा पाय महिषासुरावर ठेवलेला आहे.या वरुन तीची आक्रमकता दिसून येते.म्हणून या देवीला ऐतिहासिक महत्त्व आहे. क्षत्रिय कुलांची कुलदेवता असून ती प्रत्येक कुलाच्या निवासाच्या जागी तिला स्थान दिले आहे.महाराष्ट्रात इतर देवतांशी तिचे नाते प्रस्थापित असल्याचे दिसते.या देवीला नगर जिल्ह्यातून पलंग येतो,चैत्रात शिखर-शिंगणापूरहून पवित्र जलकुंभासह काठ्या-ध्वज येतात.कर्नाटक राज्यातील शाकंभरी देवीच्या उत्सवाप्रमाणे या देवीचा शाकंभरी नवरात्राचा उत्सव पार पडतो. संपूर्ण महाराष्ट्राला धैर्याची आणि शैर्याची प्रेरणा देणारी शक्तीदेवी म्हणून या देवीची महती आहे.

तुळजापूरची भवानामाता संपूर्ण महाराष्ट्राची कुलस्वामीनीचआहे.कुलांची अधिष्ठात्री देवता, उस्मानाबाद जिल्हयातील बालाघाटच्या डोंगरपठारावर वसलेले या ठाणी आदिशक्ती कुकुर दैत्याला ठार मारण्यासाठी शक्तीमाता प्रकटली. भवानीमातेला त्वरीता, त्वरजा, तुरजा, तुकाई अशा अनेक नावांनी ओळखले जाते. राजा छत्रपत्री शिवाजी महाराज यांनी भवानी मातेच्या कृपार्शीवादानेच विजय प्राप्त केला असे इतिहासकार सांगतात. तुळजाभवानीची यात्रा अश्वीन शुध्द प्रतिपदेस सुरूवात होऊन विजयादशमीस संपते.या शिवाय गुढीपाडवा बलिप्रतिपदा मकरसंक्रात रथसप्तमी या दिवशीही देवीचा उत्सव साजरा केला जाते.भवानीचा भक्त म्हणून भुत्या,आराधी, गळयात कवडयाच्या माळा, डोईवर टोप, त्याला कवडया बसवलेल्या, अंगात तेलाने माकलेले कपडे, हातात पोत तोंडी भवानीमातेची गाणी म्हणतात. भवानामातेचे पुण्याजवळ कोंढणपूरलाही ठाणेआसुन. नेपाळ या देशात काठमांडू येथे ही भवानी मातेचे मंदिर आहे. तुळजापुरातील गरीबनाथ मठात हिंगलाज देवी आहे.तसेच ही देवी उस्मानाबाद तालुक्यातील तेर या गावी आहे.तेर प्राचिन कालखंडात आंतरराष्ट्रीय व्यापाराचे केंद्र होते.बौध्द जैन शैव आणि वैष्णव अशा विविध धर्मांचे प्राबल्य येथे असल्याचे पुरावे आजही टिकून आहेत. मातृदेवतांच्या उपासनापंथाचे कार्य येथील मंदिरावरून दिसून येते.

डॉ.रा.चिं.ढेरे यांच्या श्रीतुळजाभवानी या ग्रंथात श्री राज कुलकर्णी यांचे मत असे आहे की, तेर इथे कोष्टांबिकादेवी, हिंगळाजवाडी इथे हिंगळजाई आणि मातंगी,जागजीची महिषासुरमर्दिनी या सारख्या शक्तीदेवतांचे प्राबल्य दिसून येते.पण या साऱ्याहूंन आश्‍चर्यकारक गोष्ट म्हणजे तेरला सापडलेल्या लज्जागौरीप्रतिमा,अशा प्रतिमा मोठया प्रमाणात सापडल्या असून कांही मूर्ती दगडाच्या आहेत,तर कांही मातीच्यासुध्दा आहेत या प्रतिमांत स्त्रियांच्या फक्त कमरेखालचा भाग असून,त्यांचा योनीप्रदेश उठावून दाखवला आहे. कांही शिल्पात स्तनसुध्दा उठावदार दाखवले आसून डोक्याच्या जागेवर कमळाचे फूल कोरले आहे.त्याला कमलशीर्ष म्हणतात. या देवता कुलदेवता म्हणूनच रूढ होत्या.हिंगलाज देवतेचे मंदिर सोलापूर शहरात गणेश पेठेत असून यादेवीची कथा रेवा संस्थानातील आहे.हिंगलाज देवता ही धरित्री देवता असून या देवीची पूजा सिंध व मुंबई प्रांतात केली जाते. या देवीचा भक्त भावसार क्षत्रिय समाजातील आहे.हिंगळजा देवीची मंदिरे महाराष्ट्रात दुर्मिळ आहेत. त्यात उस्मानाबाद आणि सोलापूर जिल्ह्यात फक्त ही मंदिरे पहायला मिळतात.

रेणुकादेवी ही भूतमातृदेवी म्हणुन प्रसिध्द आहे.गोंधळ हा रेणुकाच्या उपासकांचा विधी आहे.गोंधळ हा शब्द महानुभावांच्या ग्रंथात आणि ज्ञानेश्वरीत एकाच अर्थाने येतो. रेणुकादेवीचे माहूर हे पवित्र तीर्थक्षेत्र आहे.यवतमाळ जवळ चाळिस मैलावर डोंगराळ प्रदेशात गडावर रेणुकादेवीचे मंदिर आहे.जमदग्नीची पत्नी रेणुका आणि रेणुकाचा पुत्र परशुराम,रेणुकेची मूर्ती नाही दर्शन तांदळारुपात आहे.तीचे उग्र रूप असल्याने तिला महाकालीचे रूप समजले जाते.रेणुकेला, रणवीरा, यमाई या देवतांचे स्वरुप मानले जाते.कर्नाटकात रेणूकादेवीला यल्लम्मा नावाने पूजले जाते. कर्नाटकात रूढ असलेल्या यल्लम्माच्या पूजाप्रकारावरुन या उत्सवात रेणूकेपेक्षा भूमातेची पूजा अभिप्रेत दिसते रेणूका देवी विदर्भ,मराठवाड्यातील कांही भागात कुलदेवता म्हणून पूजली जाते.रेणूकाच्या प्राचिनत्वा विषयी फारसे पुरावे उपलब्ध होत नाहीत.आख्यायिका, पुराणकथा यातून हे संदर्भ मिळतात. रेणूकामातेच्या आगमनाची कथा सह्याद्रीखंड आणि कालिकाखंडातून घेतली आहे.ती कथा लोक परंपरेत रुढ झाली.रेणूकामाता ही देवता तांदळारुपात असल्याने ती देवी स्वयंभू समजली जाते.या देवता मानवनिर्मित नाहीत तर त्या नैसर्गिक आहेत अशी लोकांची धारणा आहे.रेणूका देवीचे दर्शन रुप म्हणजे,तांदळ्याला दोन सूरेख डोळे, कोपलेले असून नाक रुंद दाखविले जाते.नाकात नथ ,कपाळावर ठसठसीत कुंकू असते.डोक्यावर चांदीचा गोलाकार मुकुट असतो एकूणच रेणूकाचा मुखवटा देखणा, विलोभनीय आणि प्रसन्न दिसतो.या देवतेची पूजा बांधल्यावर अकराशे पानाचा विडाच्या भोग दिला जातो. रेणूका देवीच्या तीर्थाचे महत्त्व देवीसंस्कृतीत कायम आहे.

महाराष्ट्र आणि कर्नाटकाच्या सीमेवर दक्षिण काशी असलेल्या, करवीर क्षेत्राची आदिमाया, अदिमाता, महालक्ष्मी ही या दोन्ही प्रदेशात लोकप्रिय आहे. ब्रह्मस्पयसूत्र या पूराणात या देवीचा 'कोल्हा'असा उल्लेख येतो, 'कोल्होदेवी' असेही संबोधले जात होते. पंचगंगेच्या तीरावर कोल्लासुराला महालक्ष्मीने ठार केले. म्हणूनच या नगरीला कोल्हापूर या नावाने ओळखले जाते. त्यामुळे या प्रदेशाला पावित्र्य प्राप्त झाले.महालक्ष्मीला चार हात आहेत. महाराष्ट्रात अनेक ठीकाणी महालक्ष्मीची ठाणी आहेत.या देविला जगदंबा या नावाने ओळखले जाते. या महालक्ष्मी देवीच्या शेजारी महाकाली आणि महासरस्वती देवी अवतरलेल्या आहेत.महालक्ष्मी हे साडेतीन पीठामध्ये एक पूर्ण पीठ समजले जाते. या देवतेसंबंधी अनेक साधने उपलब्ध आहेत. त्याचे कारण ही महालक्ष्मी मराठ्यांच्या अमलाखाली होती व राजघराण्याच्या धार्मिक आचरणात लोकप्रिय होती. या देवीच्या मंदिराच्या बांधणीवरूनच देवीची प्राचिनता स्पष्ट

होते.करवीरवासिनी म्हणून देवीला विशेष महत्त्व प्राप्त झाले होते. महालक्ष्मीची तीन फूट उंचीची मूर्ती उभी असून मूर्ती प्रमाणबध्द आहे.ही मूर्ती नेहमी वस्त्रालंकाराने आच्छादलेली असते. अंगावर भरपूर दागिने चढवलेले असतात.ही अनेक कुलांची देवता आहे. ही देवता कर्नाटक,आंध्र गुजरात या राज्यातही असल्याचे उल्लेख सापडतात. अन्य देवतांचे एवढ्या मोठ्या प्रमाणात उल्लेख सापडत नाहीत.महाराष्ट्रात जवळपास अकरा ठिकाणी या देवतेचे अस्तित्व आहे. महानुभावांच्या ग्रंथात या संदर्भात माहिती मिळते. देवीभागवत या ग्रंथात महालक्ष्मीचा स्पष्ट उल्लेख आहे. कांही ग्रंथात ही देवी पार्वतीचे रुप असल्याचे सांगितले आहे. या मंदिरात वर्षभर भाविकांची वर्दळ असते. परकीयांच्या आक्रमणात देवीच्या सुरक्षीततेसाठी कांही वेळा देवीची मूर्ती दुसरीकडे हालवावी लागली. तरीही देवीचे आस्तित्व करवीरनगरीत स्थित राहिले हे महत्त्वाचे वाटते.

महाराष्ट्रात नाशिकजवळ उत्तरेला सत्तावीस मैलावर दिंडोरी तालुक्यात वणीपासून डोंगराला प्रारंभ होतो ते देवीच्या पायथ्यापर्यंत गड पहाड आहे.नांदुरी गडावर सप्तशृंगीचे स्वयंभू मंदिर आहे.या देवीचे सासर कोकणात तर माहेर खानदेशात आहे.भलामोठा डोंगर कपार फोडून दहा वीस फुट दगडावरच अठरा बाहू असलेली आदिशक्ती सप्तशृंगी देवी प्रकटलेली आहे.देवीची एका बाजूला थोडी तिरकस झालेली, मूर्ती सुंदर पध्दतीने कोरलेली आहे. गडावर सात शिखरे आहेत. यात सात देवतांचे वास्तव्य आहे.यामुळेच सप्तशृंगादेवी असे नाम प्राप्त झाले. ज्ञानेश्वरी आणि दासबोधात या देवीचा उल्लेख येतो. शक्तीदेवीचे स्थान उंच डोंगर कडेला वसलेल्या आहेत जणू काही भक्तांची ते परीक्षा पाहात आहेत. सह्याद्रीच्या उत्तर भागात सर्वात उंच शिखरावर कळसूबाई स्थान मांडून आहे, तर मावळात उंच कडेवर एकवीरा देवी बसली आहे.तसेच एका उंच गडावर शिवाईदेवी मराठी अस्मिता जागी करण्यासाठी अवतरली होती की काय? असे वाटते. या शक्तीदेवीच्या आशीर्वादाची छाया महाराष्ट्रावर आहे. सप्तशृंगी देवीच्या प्रकटना विषयी एक रुढ लोककथा अशी आहे, लक्ष्मण शक्तीच्या प्रसंगी, हनुमान द्रोणागिरी पर्वत उचलून घेऊन जात असताना त्याचा एक भाग मध्येच पडला,त्याच्यापासून सप्तशृंग पर्वत तयार झाला.तेथे या देवीचे स्थान आहे.असा उल्लेख महानुभाव साहित्यातून येतो. या गडावर अनेक शक्तींचा वास आहे. महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपीठा पैकी हे एक अर्धपीठ मानले जाते. या देवीच्या संदर्भात असलेल्या अनेक प्रथा अविश्रातपणे चालू आहेत.

महाराष्ट्रातील एक जागृत शक्तीपीठ म्हणजे मराठवाड्यातील अंबाजोगाईची योगेश्वरी देवी होय.या देवतेला कुलस्वामीनी म्हणून मानले जाते. या देवीचा भक्त मूळ कोकणातला आहे. अशा भक्तांची ही देवी आहे असे म्हटले जाते. कोकणात या देवीचे भक्त असून त्यांची ही कुलदेवता आहे. या देवीच्या भक्तांची चौदा गोत्र आज कोकणात नांदतात. कोकण आणि देश यांचे नाते प्रस्थापित करण्यासाठी आलेली अशी लोककथा असावी असे वाटते.दैवतांचा अवतार हा दुष्ट शक्तीचा संहार करण्यासाठी झाला, तेथेच त्याचे वास्तव्य स्थित झले, हे मान्य करावे लागते. या देवीच्या अवतरणाच्या कांही लोककथा या भागात सर्वश्रुत आहेत. महाराष्ट्रातल्या बहुतांश शक्तीदेवीच्या मूर्ती या तांदळा रुपात आहेत.या शेंदुरर्चचित तांदळयाला आपल्या कल्पकते प्रमाणे ग्रामस्थ सजवतात. या देवीच्या मुखवट्याला ओमकार रुप मानले आहे.तिचा चेहरा हा अर्धगोलाकार असून तिच्या मुखापासून गालाला एक आकार आला आहे. हनुवटीवरुन वस्त्र परिधान केले आहेत.देवीच्या हातात शस्त्र नाही तिच्या हातात परडी आहे.तिचे रुप उग्र असुनही भक्तांना तिचे रुप प्रिय आहे.

योगेश्वरी देवीला येथील वैद्यनाथ देवाशी लग्न करण्याकरिता आणले होते परंतु देवीला हे अमान्य होते म्हणून देवी आलीकडेच येऊन थांबली. तेथेच परळी -वैजनाथपासुन जवळच सोळा मैलावर जीवंती नदीच्या काठी या जोगेश्वरीने आपले स्थान निश्चित केले. या ठिकाणी देवीचे प्राचिन मंदिर आहे. दुसरी एक आख्यायिका सांगितली जाते की, देवीने दंतासुराचा एक दात उपटून त्याचा वध केला. या करण्यासाठीच देवीने अवतार घेतला होता, असे पुराणग्रंथात सांगितले आहे.या देवीची मूर्ती नाही रेणुकादेवी सारखी तांदळाच्या स्वरुपात ती अवतरली आहे. जोगेश्वरी देवीचे मंदिर हेमाडपंती असुन, हे मंदिर यादव सेनापती खोलेश्वर यांनी बांधले आहे.ही देवता महाराष्ट्रात अनेक ब्राह्मण कुटुंबाचे कुलदैवत आहे.

येरमाळा हे गाव उस्मानाबाद पासून साधारण पन्नास कि.मी. अंतरावर आहे.प्रभुरामचंद्र वनवासाला जाताना, प्रलोभन दाखवण्यासाठी देवी पार्वतीने, सतीचे रुप घेऊन रामाला भुलवण्याचा प्रयत्न केला. तेंव्हा रामाने पार्वतीला 'येडी आहेस!' असे म्हटले तेव्हापासून ही येडाई या नावाने प्रसिध्द झाली.इथे राहीली व तिचे नाव येडाई ऊर्फ येडेश्वरी झाले.या आख्यायिकेचा उल्लेख रेणुकास्त्रोत्रात आला आहे. दरवर्षी येथे मोठी यात्रा भरते, महाराष्ट्रातून अनेक भक्त देवीच्या यात्रेला आपला नवस फेडण्यासाठी येतात. लोकांच्या ईच्छापूर्ण करणारी देवी असा या देवीचा लौकिक आहे.

मराठवाड्यात भूम तालुक्यात माणकेश्वर येथे सटवाईचे प्रसिध्द मंदिर आहे.महाराष्ट्रात मूल जन्मल्यानंतर पाचव्या दिवशी त्याची पाचवी पूजली जाते.आणि पंधरा ते वीस दिवसानंतर त्याची सटवाई पूजली जाते.प्रत्येक खेड्यात सटवाईचे ठिकाण असतेच. मूर्ती रुपात ही देवी नसते.कुठेतरी नदीच्या काठावर लिंबाच्या, अथवा कोणत्याही झाडाखाली या देवीचे छोटेसे मातीचे किंवा दगडा-गोठ्याचे मंदिर असते. परंतु माणकेश्वर येथे सटवाईचे मंदिर आहे. आणि विशेष म्हणजे,या सटवाईची सुंदर कोरीव अशी मूर्ती मंदिरात पाहायला मिळते. 'षष्ठी' या शब्दाचा सटवी असा अपभ्रंश झाला असावा असे वाटते.ही देवी मातृका देवी असून या देवीने बालसंगोपन आणि

वंशवृध्दीचे काम करावे यासाठी या सटवाईची पूजा केली जाते.सटवाई या देवीला षष्ठीदेवता,एक शुद्रदेवता,सटवी,सटी, दुर्गा या नावांनी ही देवता ओळखली जाते.

**निष्कर्ष :-**

आज सुध्दा अनेक देवता प्रचलित आहेत.माणसानेच या देवता निर्माण केल्या आहेत. आपले जीवन सुखी जावे.मनातील इच्छा आकांक्षा पूर्ण व्हाव्यात,आपला वंश सुखरूप वाढला पाहिजे. या बरोबर आपला शत्रुचा नायनाट व्हावा अशी कामना मनी बाळगणारे लोक अनेक देव-देवतांना आमंत्रण देतात.स्त्री देवता प्रमुख देवता म्हणून ओळखल्या जातात.शक्तीची उपासना करणारा शाक्तपंथ प्राचिन काळापासून ओळखला जातो.शक्तीचे दृश्यरुप स्त्रीशक्तीच आहे.म्हणुन देवीला आठ हात, सहा हात आणि त्या हातात हत्यारे दाखविले जातात.किंवा पायाखाली यक्ष-राक्षस असते.उदा.कलकत्याची कालीमाता,या देवीला बकऱ्याचा बळी दिला जातो.रक्ताचा टीळा लावला जातो. बंगालची दुर्गामाता या देवीची उपासना केली जाते.हिच शक्तीची उपासना होय.महाराष्ट्रात आणि कर्नाटकात,कोल्हापुरची-अंबाबाई,आरगेची-लज्जागौरी, औंधची-यमाई, सौंदतीला (रेणुका)-यल्लम्मा, मुंबईची-मुंब्रादेवी,धारावीमाता, कार्लेची- एकवीरा या सारख्या असंख्य स्त्रीदेवता पुजल्या जातात.

या वरुन असे स्पष्ट होते,काळ आणि क्रिया ही दोन तत्त्वे दैवतांच्या उत्पत्तीच्या मूळाशी आहेत. लोकजीवन उत्कट भावनांनी आणि अपार श्रध्देने ओसंडून वहात आहे, भावविश्वाशी या स्त्रीदेवतांचा संबंध येतो. यामूळे मानवाने अनेक मातृदेवता तयार केल्या,वेगवेगळया आकाराच्या, स्वरुपाच्या, अशा मातृदेवता वत्सलमाता माय असून, शक्तीशाली संरक्षक, संवर्धक आसतात, मोठ्या डोळयांची मातृदेवता ग्रामजनावर नजर ठेवते,लहान मूलांचे संरक्षण करते. अशी मातृदैवतांची प्रतिमा तयार झाली.

**संदर्भ-टीपा :**

१. प्रभूदेसाई प्रल्हाद कृष्ण - आदिशक्तीचे विश्वस्वरुप,
२. ढेरे रा.चिं - महाराष्टाचा देव्हारा,
३. बाबर सरोजनी - नंदादीप
४. मांडे प्रभाकर - लोकसाहित्याचे अंतःप्रवाह,
५. कालभूत पुरुषोत्तम- लोकसाहित्य स्वरुप आणि विवेचन,